सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष १, अंक १ ] शुक्रवार, मार्च २०, २००९/फाल्गुन २९, शके १९३० [ पृष्ठ क्र. ६, किंमत रुपये १८.००

असाधारण क्रमांक १३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.**—लोकसभा निवडणुकांच्या दृष्टीने महानगरपालिका व नगरपरिषदा यांनी वित्तीय वर्ष २००९-२०१० चा विशेष अर्थसंकल्प तयार करण्यासाठी तरतुदी करण्याकरिता अध्यादेश. .. .. | १-६ |

## नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० मार्च २००९.

## MAHARASHTRA ORDINANCE No. III OF 2009.

AN ORDINANCE

TO MAKE PROVISIONS FOR PREPARATION OF SPECIAL BUDGET IN THE FINANCIAL YEAR 2009-2010 BY THE MUNICIPAL CORPORATIONS AND MUNICIPAL COUNCILS, IN VIEW OF THE LOK SABHA ELECTIONS.

**सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.**

**लोकसभा निवडणुकांच्या दृष्टीने महानगरपालिका व नगरपरिषदा यांनी वित्तीय वर्ष २००९-२०१० चा विशेष अर्थसंकल्प तयार करण्यासाठी तरतुदी करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्यात, एप्रिल २००९ या महिन्यामध्ये लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत ;

**आणि ज्याअर्थी**, मुक्त व निःपक्ष वातावरणात निवडणुका घेण्याची सुनिश्चिती करण्याकरिता एक आदर्श आचार संहिता यापूर्वीच लागू करण्यात आली आहे ;

**आणि ज्याअर्थी**, विहित आचार संहितेस अनुसरून, निवडणुका मुक्त व निःपक्ष वातावरणात होण्याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, २००८-२००९ या वर्षाच्या सुधारित अंदाजास मंजुरी देण्यासाठी, आणि स्थायी समितीने, कोणत्याही कारणास्तव, अर्थसंकल्पीय प्रस्ताव सादर केले नसतील किंवा महानगरपालिकेने व नगरपरिषदेने अशा प्रस्तावांना मंजुरी दिली नसेल तर, १ एप्रिल २००९ रोजी प्रारंभ होणा-या आणि ३१ जुलै २००९ रोजी किंवा सार्वत्रिक निवडणुकांनंतर उक्त महानगरपालिकांकडून व नगरपरिषदांकडून ज्या अगोदरच्या दिनांकास नियमित अर्थसंकल्प तयार करण्यात येईल त्या दिनांकास समाप्त होणा-या कालावधीत अंमलात राहील असा विशेष अर्थसंकल्प अशा महानगरपालिकांकडून किंवा नगर-परिषदांकडून तयार करण्यात यावा यासाठी तात्पुरता कायदा करून, विशेष तरतुदी करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

**आणि ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी**, उपरोक्त प्रयोजनांकरिता, तात्पुरता कायदा करून विशेष तरतुदी करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता**, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (तात्पुरत्या तरतुदी) अध्यादेश, २००९ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

व्याख्या.

२. या अध्यादेशामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "संबद्ध नगरपालिका कायदा" म्हणजे,—

(एक) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत, मुंबई महानगरपालिका अधिनियम ; १८८८ चा मुंबई ३.

(दोन) नागपूर शहर महानगरपालिकेच्या बाबतीत, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ ; १९५० चा मध्यप्रांत व व-हाड २.

(तीन) इतर कोणत्याही महानगरपालिकेच्या बाबतीत, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ ; आणि १९४९ चा मुंबई ५९.

(चार) नगरपरिषदांच्या बाबतीत, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ ; १९६५ चा महा. ४०.

(ख) या अध्यादेशात वापरलेले, परंतु त्यांची व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना संबद्ध नगरपालिका कायद्यामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल, तोच अर्थ असेल.

विवक्षित महानगरपालिका आणि नगर परिषदा यांच्या अर्थसंकल्पीय अंदाजाकरिता विशेष तरतुदी.

३. (१) जर कोणत्याही कारणास्तव,—

(एक) महानगरपालिकेची किंवा नगरपरिषदेची स्थायी समिती, महानगरपालिकेला किंवा, यथास्थिती, नगरपरिषदेला अर्थसंकल्पीय अंदाज सादर करण्याच्या स्थितीत नसेल तर; किंवा

(दोन) महानगरपालिका किंवा नगरपरिषद, २००९-२०१० या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजास, मान्यता देण्याच्या स्थितीत नसेल तर,—

संबद्ध नगरपालिका कायद्यामध्ये किंवा त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) महानगरपालिकेच्या बाबतीत, आयुक्त ;

(ख) बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या बाबतीत, महाव्यवस्थापक ;

(ग) परिवहन उपक्रमांच्या बाबतीत, परिवहन व्यवस्थापक ; आणि

(घ) नगरपरिषदांच्या बाबतीत, मुख्य अधिकारी,

त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक अर्थसंकल्पाच्या बाबतीत २००८-२००९ या शासकीय वर्षाच्या किंवा, यथास्थिती, वित्तीय वर्षाच्या सरासरी मासिक उत्पन्न व खर्च यांच्या चारपटी एवढे अंदाजित उत्पन्न व खर्च याचे विवरणपत्र तयार करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये तयार करण्यात आलेल्या विवरणपत्राचा अन्वयार्थ, शासकीय वर्ष किंवा वित्तीय वर्ष २००९-२०१० याच्या पहिल्या चार महिन्यांचा अर्थसंकल्प म्हणून लावण्यात येईल, आणि तो, ३१ जुलै २००९ पर्यंत किंवा संबंधित महानगरपालिका किंवा नगर परिषदा, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर, नियमित अर्थसंकल्प ज्या अगोदरच्या तारखेस अंतिमरित्या निश्चित करण्यात येईल अशा तारखेपर्यंत अंमलात राहील.

संबद्ध नगरपालिका कायदा व त्याखाली तयार केलेले नियम लागू राहणे.

४. या अध्यादेशाद्वारे अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, संबद्ध नगरपालिका कायद्यामध्ये किंवा त्याखाली केलेल्या नियमांमध्ये असलेल्या अर्थसंकल्प तयार करण्यासंबंधातील तरतुदी, या अध्यादेशाद्वारे करण्यात आलेल्या तरतुदींशी त्या जेथवर विसंगत नसतील तेथवर, योग्य त्या फेरफारांसह, अर्थसंकल्प तयार करण्याच्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात लागू होतील.

आयुक्त व मुख्य अधिकारी यांचे तात्पुरते विशेष अधिकार.

५. (१) महानगरपालिकेचा आयुक्त किंवा नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी यांना २००८-२००९ या शासकीय वर्षात किंवा वित्तीय वर्षात कोणतीही विशेष किंवा अनपेक्षितपणे उद्‌भवलेली गरज भागविण्याच्या प्रयोजनाकरिता, उक्त वर्षात, कोणत्याही अर्थसंकल्पीय अनुदानाची रक्कम वाढविता येईल, कमी करता येईल किंवा अतिरिक्त अर्थसंकल्पीय अनुदान मंजूर करता येईल.

(२) कलम ३ च्या पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्त किंवा, यथास्थिती, मुख्य अधिकारी यांना २००९-२०१० या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांच्या आत करावयाच्या आवश्यक खर्चाचे स्वरूप विचारात घेऊन, त्यास आवश्यक वाटेल अशी पुरेशी तरतूद करता येईल.

अडचणी दूर करणे.

**६.** या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध नगरपालिका कायद्यांपैकी कोणत्याही कायद्याच्या किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासन, प्रसंगानुरूप, आदेशाद्वारे अडचण दूर करण्याच्या दृष्टीने आवश्यक वाटेल तर, ह्या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध नगरपालिका कायद्याच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट करू शकेल.

## निवेदन

मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या तरतुदींद्वारे ज्या विविध नगरपालिका प्राधिका-यांकडे उक्त अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्याचे काम सोपविण्यात आलेले आहे त्यांना आगामी वित्तीय वर्षासाठी किंवा शासकीय वर्षासाठी उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार करणे आवश्यक करण्यात आलेले आहे. महानगरपालिकांच्या संबंधात प्रत्येक वर्षाच्या फेब्रुवारी व मार्च महिन्यांमध्ये, आणि नगरपरिषदांच्या संबंधात डिसेंबर महिन्यामध्ये असे अंदाज तयार करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येते.

२. राज्यात लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका एप्रिल, २००९ या महिन्यामध्ये घेण्यात येणार आहेत. त्यानुसार, निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाल्यावर एक आदर्श आचार संहिता यापूर्वीच लागू करण्यात आली आहे. आदर्श आचार संहिता लागू झाल्यानंतरच्या कालावधीमध्ये नवीन योजना, सुधारित कर, इत्यादि घोषित करण्यावर निर्बंध आहेत. करिता, महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांनी यापूर्वीच २००९-२०१० या शासकीय वर्षाकरिता किंवा वित्तीय वर्षाकरिता, त्यांचे अर्थसंकल्पिय अंदाज स्वीकृत केलेले नसतील तर, त्यांना आदर्श आचार संहिता अंमलात असेतोपर्यंत ते स्वीकृत करणे शक्य होणार नाही.

पहिल्या चार महिन्यांमधील खर्चाची तरतूद करण्यासाठी महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांना शक्य व्हावे म्हणून महानगरपालिकेच्या आयुक्तास, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमांच्या महाव्यवस्थापकास, परिवहन उपक्रमांच्या परिवहन व्यवस्थापकांना आणि महानगरपरिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यास पुढील अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे,—

(एक) संबद्ध नगरपालिका कायद्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक अर्थसंकल्पाच्या बाबतीत २००८-२००९ मधील शासकीय वर्षाच्या किंवा वित्तिय वर्षाच्या सरासरी मासिक उत्पन्न व खर्चाच्या चारपटी एवढे अंदाजित उत्पन्न व खर्च यांचे विवरणपत्र तयार करील आणि अशा विवरणपत्राचा अन्वयार्थ २००९-२०१० मधील शासकीय वर्षाच्या किंवा, यथास्थिति, वित्तिय वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांचा अर्थसंकल्प म्हणून लावण्यात येईल आणि तो ३१ जुलै २००९ पर्यंत असे विवरणपत्र अंमलात रहाण्याकरिता किंवा संबंधित महानगरपालिका किंवा नगरपरिषदांकडून नियमित अर्थसंकल्पास ज्या अगोदरच्या तारखेस अंतिम स्वरूप देण्यात येईल त्या तारखेपर्यंत अंमलात राहील ; आणि

(दोन) उक्त वर्षात कोणतीही विशेष किंवा अनपेक्षितपणे उद्‌भवलेली गरज भागविण्याच्या प्रयोजनाकरिता, २००८-२००९ मधील शासकीय वर्ष किंवा, यथास्थिति, वित्तिय वर्ष यांच्या कोणत्याही अर्थसंकल्पीय तरतुदीची रक्कम वाढविणे, कमी करणे किंवा अतिरिक्त अर्थसंकल्पीय तरतूद करणे.

म्हणून, याबाबतीत तात्पुरता कायदा करून, उक्त प्रयोजनांकरिता विशेष तरतुदी करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही व उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, तात्पुरता कायदा करुन, विशेष तरतुदी करण्याकरिता तात्काळ कार्यवाही करणे जी मुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**एस. सी. जमीर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक २० मार्च २००९.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनुकुमार श्रीवास्तव,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक ३] शुक्रवार, मार्च २०, २००९/फाल्गुन २९, शके १९३० [पृष्ठे ६, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्र. १७

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Temporary Provisions) Ordinance, 2009 (Mah. Ord. III of 2009), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

(Translation in English of the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Temporary Provisions) Ordinance, 2009 (Mah. Ord. III of 2009), published under the authority of the Governor.).

---

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 20th March 2009.

**MAHARASHTRA ORDINANCE No. III OF 2009.**

*AN ORDINANCE*

*to make provisions for preparation of special budget in the Financial Year 2009-2010 by the Municipal Corporations and Municipal Councils, in view of the Lok Sabha Elections.*

WHEREAS the general elections to the *Lok Sabha* in the State are to be held in the month of April 2009 ;

AND WHEREAS the Model Code of Conduct to ensure holding of free and fair elections has already came into force ;

AND WHEREAS in consonance with the prescribed Code of Conduct, with a view to ensure the free and fair elections, the Government of Maharashtra considers it expedient to make special provisions by making a temporary law for sanction of revised estimates for the year 2008-2009 and, preparation of special budget by such Municipal Corporations and Municipal Councils, where, for any reason either the budget proposals cannot be submitted by the Standing Committee or such proposals cannot be passed by the Corporations and Councils, to be operative for a period commencing on the 1st April 2009 and ending on the 31st July 2009 or such earlier date on which the regular budgets are made by the said Municipal Corporations and Councils after the said general elections ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to make special provisions, by making a temporary law, for the purposes aforesaid ;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

1. (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils (Temporary Provisions) Ordinance, 2009.

(*2*) It shall come into force at once.

Definitions.

2. In this Ordinance, unless the context otherwise requires,—

(*a*) "relevant municipal law" means,—

(*i*) in the case of the Municipal Corporation of *Brihan Mumbai*, the Mumbai Municipal Corporation Act ; Bom. III of 1888.

(*ii*) in the case of the Municipal Corporation of the City of Nagpur, the City of Nagpur Corporation Act, 1948 ; C.P. and Berar II of 1950.

(*iii*) in the case of any other Municipal Corporation, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 ; and Bom. LIX of 1949.

(*iv*) in the case of the Municipal Councils, the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 ; Mah. XL of 1965.

(*b*) words and expressions used in this Ordinance, but not defined herein shall have the meanings respectively assigned to them in the relevant municipal law.

Special provisions for budget estimates of certain Corporations and Councils.

**3.** (*1*) If for any reason,—

(*i*) the Standing Committee of the Corporation or of the Council is not in a position to submit the budget estimates to the Corporation or to the Council, as the case may be; or

(*ii*) the Corporation or the Council is not in a position to approve the budget estimates for the financial year 2009-2010,

then notwithstanding anything contained in the relevant municipal law or the rules contained therein or made thereunder,—

(*a*) in the case of the Municipal Corporations, the Commissioner,

(*b*) in the case of the *Brihan* Mumbai Electricity Supply and Transport Undertaking, the General Manager ;

(*c*) in the case of the Transport Undertakings, the Transport Manger ; and

(*d*) in the case of the Municipal Councils, the Chief Officer, shall prepare a statement of the estimated income and expenditure equal to four times the average monthly income and expenditure for the official year or, the financial year 2008-2009 in case of each of the budgets specified therein.

(*2*) The statement prepared under sub-section (1) shall be construed as the budget for the first four months of the official year or the financial year 2009-2010, as the case may be, and will be in operation till the 31st July 2009 or till such earlier date on which the regular budgets are finalised by the concerned Municipal Corporation or the Municipal Council after the general elections to the *Lok-Sabha*.

Application of relevant municipal law and rules contained therein or made thereunder.

**4.** Except as otherwise provided by this Ordinance, the provisions with regard to preparation of the budgets contained in the relevant municipal law or the rules contained therein or made thereunder shall, to the extent they are not inconsistent with the provisions made by this Ordinance, *mutatis mutandis*, apply in respect of preparation of budget or any matter connected therewith.

Special temporary powers of Commissioner and Chief Officer.

**5.** (*1*) The Commissioner of the Corporation or the Chief Officer of the Council, may, during the official year or financial year 2008-2009, increase or decrease the amount of any budget grant or make an additional budget grant for the purpose of meeting any special or unforeseen requirement arising during the said year.

(*2*) Nothwithstanding anything contained in sub-section (*1*) of section 3, the Commissioner or the Chief Officer, as the case may be, may make adequate provision as he deems expedient, considering the nature of expenditure required to be incurred, during first four months of the year 2009-2010.

Removal of difficulty.

**6.** If any difficulty arises in giving effect to the provisions of any of the relevant municipal law or rules contained therein or made thereunder, as they stand amended by this Ordinance, the State Government may, as occasion arises, by order, take such action, not inconsistent with the provisions of the relevant municipal law, as amended by this Ordinance, as appears to it to be necessary for the purposes of removing such difficulty.

## STATEMENT

The provisions of the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, the City of Nagpur Corporation Act, 1948 and the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965, make it imperative for the various municipal authorities, who are charged with carrying out the provisions of the said Acts, to prepare the estimate of income and expenditure for the ensuing financial year or official year. The process of preparation of such estimates is initiated, in respect of Municipal Corporations in the months of February and March each year, in respect of Municipal Councils in the month of December and culminates in its final adoption in the months of February or March.

2. The general elections to the *Lok Sabha* in the State are to be held in the month of April 2009. Accordingly, the Model Code of Conduct has already came into force on declaration of the election programme. During the period the Model Code of Conduct is effective, there are restrictions on the announcing of new schemes, revision of taxes, etc. As such, in case the Municipal Corporation or the Municipal Council has not adopted its budget estimates for the official year or financial year 2009-2010, it may not be possible for such bodies to adopt such estimates, till the Model Code of Conduct remains in force.

In order to enable such Municipal Corporations or Municipal Councils to make provisions for the expenditure during the first four months, the Commissioner of the Municipal Corporation and the General Manager of the Brihan Mumbai Electricity Supply and Transport Undertaking, the Transport Manager of the Transport Undertaking and the Chief Officer of the Municipal Councils are required to be empowered—

(*i*) to prepare a statement of estimated income and expenditure equal to four times of the average monthly income and expenditure for the official year or the financial year 2008-09, in case of each of the budgets specified therein, and to provide for such a statement to be construed as the budget for the first four months of the official year or the financial year 2009-2010, as the case may be, and for such a statement to be in operation till the 31st July 2009 or till such earlier date on which the regular budgets are finalised by the concerned Municipal Corporation or the Municipal Councils; and

(*ii*) to increase or decrease the amount of any budget grant or make an additional budget provision for the official year or financial year 2008–2009, as the case may be, for the purpose of meeting any special or unforeseen requirement arising during the said year.

The Government, therefore, considers it expedient to make special provisions, for the said purposes, by making a temporary law in this behalf.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to make special provisions by making a temporary law, for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 20th March 2009.

S. C. JAMIR,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANU KUMAR SHRIVASTAV,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.